तरुण भारत



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना पुस्तक भेट देताना प्रा. संजय ठिगळे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. रणधीर शिंदे.

# आर्थिक विकासासाठी साक्षरता, शिस्त महत्त्वाची

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

प्रतिनिधी

कोल्हापूर

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक साक्षरता, शिस्त आणि आर्थिक पारदर्शकता महत्त्वाची असते. आर्थिक साक्षरतेच्या मोहिमेत अर्थतज्ज्ञ, लेखकांची भूमिका महत्त्वाची आहे. विशेषत: अलीकडच्या काळात वाढत असलेली आर्थिक फसवणूक विचारात घेता नागरिकांचे आर्थिक प्रबोधन करणे आवश्यक आहे, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी सदस्य प्रा. संजय ठिगळे यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य डॉ. रणधीर शिंदे यांना 'अर्थतरंग' हे पुस्तक भेट दिले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, अर्थसाक्षरतेशिवाय विकास शक्य नाही. विशेषत: तरुणाईने त्यामध्ये लक्ष घालणे आवश्यक आहे. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, प्रा. ठिगळे यांच्या अर्थतरंग पुस्तकाच्या माध्यमातून अर्थसाक्षरतेला निश्चितपणे चालना मिळेल. यावेळी प्रा. ठिगळे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेचा समन्वयक म्हणून काम करीत असताना समाजाशी नाळ जोडली गेली. त्या अनुभवाचा फायदा लेखन करण्यासाठी झाला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रा. ठिगळे यांच्या समाज जागृतीपर लेखन उपक्रमाचे कौतुक केले.

04 JUL 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘हरित’चा घेतला ध्यास, पर्यावरणासाठी शिवाजी विद्यापीठ खास!

## १३ हजारांहून अधिक विविध प्रकारची झाडे; यावर्षी ५०० रोपे लावण्याचे उद्दिष्ट

- विद्यापीठ परिसर ८५५ एकर; १३ हजारांपेक्षा जास्त वृक्षसंवर्धन
- रोज ६ लाख लिटर पाण्याचा पुनर्वापर
- ‘नो प्लास्टिक झोन’ उपक्रम आयोजन
- ‘नो व्हेईकल डे’तून सायकलला प्राधान्य
- कचऱ्यापासून कंपोस्ट खताची निर्मिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने 'हरित विद्यापीठ' होण्याचा संकल्प करत पर्यावरण रक्षणासाठी ठोस पावले उचलली आहेत. जैवविविधतेने नटलेल्या विद्यापीठात सध्या विविध प्रकारची १३ हजारांहून झाडे आहेत. याठिकाणी पशु-पक्षी, प्राण्यांचा अधिवास वाढत असल्याने विद्यापीठ फक्त ज्ञानाचे नव्हे तर निसर्ग संवर्धनाचे केंद्र बनत आहे.

शैक्षणिक गुणवत्ता व पर्यावरणीय




बांधिलकीमुळे विद्यापीठास राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषदेने (नॅक) ए++ दर्जा बहाल केला आहे. विद्यापीठाचा परिसर ८५५ एकरहून अधिक असून याठिकाणी विविध प्रकारे झाडे, पशु-पक्षी असल्याची नोंद आहे. विद्यापीठ परिसरामध्ये उद्यान विभागाने संगीत तलावाच्या पश्चिम बाजूस चान्सलर्स कोकोनट गार्डनमध्ये नारळाची झाडे लावली आहेत. पाण्याच्या शुद्धीकरण प्रकल्पाजवळ कुलगुरू गार्डनमध्ये जांभूळ व पिंपळ जातीची झाडे आहेत. तसेच भूगोल विभागामागे आंबा व चिकू बाग, विद्यार्थी भवन शेजारी जांभूळ बाग, कर्मचारी पतसंस्था समोर आवळा बाग, लोक कला केंद्र मागील बाजूस वारळ बाग,



क्रांतीवन शेजारील मोकळ्या जागेत चिंच आदी प्रकारची फळझाडे लावली आहेत. दूरशिक्षण केंद्राजवळ उंबर, विलायती चिंच, चाफा, करंज, कडुलिंब, पिंपळ आदी जातींची जंगली झाडे लावली आहेत. यावर्षीच्या पावसाळ्यात उद्यान विभागाने विद्यापीठ परिसरामध्ये यावर्षी ५०० रोपे लावण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

उद्यान विभागामार्फत नर्सरीमध्ये नोनी, उंबर, बदाम विलायती चिंच, चिंच, फणस, करंज, प्लुमेरिया चाफा याची सुमारे १५०० हून अधिक प्रकारची रोपे तयार केली जातात. अकेलिफा, जांभूळ, देशी आंबा प्रकारचो देशी वाणाची रातराणी, बकुळ, क्रोटॉन, गुलाब, ड्रेमिना, अगलिया, डायफंबकीय या जातीची झुडूपवर्गीय जातीची अंदाजे १८०० रोपे तयार केली आहेत. पाण्याच्या पुनर्वापर प्रकल्पातून 'वॉटर रिसायकलिंग प्लँट'च्या माध्यमातून दररोज ६ लाख लिटर पाण्याचा पुनर्वापर केला जात आहे. 'नो प्लास्टिक झोन' उपक्रम राबविले जात असून 'नो व्हेईकल डे' उपक्रमातून सायकल वापरास प्रोत्साहन मिळत आहे.

> “
> शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा जैवविविधता संपन्न आहे. त्यामध्ये स्थानिक प्रजातींचे वाण नव्हते. त्या प्रजातींची लागवड करून आणखी जैवविविधता समृद्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यातून येथील जैवविविधतेत अधिक भर पडत आहे. परिसरात आढळणाऱ्या पक्ष व फूलपाखरांची संख्या वाढली आहे.
>
> - डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ